|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.1**

जळगाव, दि. २२ (प्रतिनिधी) : महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज स्पर्धेत महाराष्ट्र पातळीवर विजेत्या ठरलेल्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संलग्नीत महाविद्यालयामधील १९ विद्यार्थ्यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ इनोव्हेशन, इन्क्युबेशन अॅण्ड लिंकेजेस केंद्राच्या वतीने उद्योजक पुर्व प्रशिक्षण देण्यात येत असून गुरुवार दि. २२ ऑगस्ट रोजी चार दिवसीय पुर्व प्रशिक्षणाचे उद्‌घाटन कुलगुरु प्रा. व्ही.एल.माहेश्वरी यांच्या हस्ते झाले.

काही महिन्यांपूर्वी  विद्यार्थ्यांकडुन नवउद्योजकीय कल्पना मागविण्यात येऊन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील १९ विद्यार्थी राज्यपातळीवर विजेते ठरले होते. त्यांना महाराष्ट्र शासनाकडुन १ लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या इन्क्युबेशन केंद्राच्या वतीने पुर्व प्रशिक्षण देण्यात येत आहे. २५ ऑगस्ट पर्यंत हे प्रशिक्षण (प्री-इन्क्युबेशन कोहोर्ट) सुरु आहे. कुलगुरु प्रा.माहेश्वरी यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. यावेळी इंडोरन्स टेक्नालॉजी कंपनीचे अधिकारी आशुतोष जहागीरदार, उद्योजक तथा केंद्राचे संचालक प्रमोद संचेती, उद्योजक अभिजीत पाटील, यांची प्रमुख उपस्थिती होती. अभिजीत पाटील यांनी उद्योजक होऊ इच्छीणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले प्रॉडक्ट आणि तंत्रज्ञानातील बदल लक्षात घेऊन स्वत:ला अपडेट करण्याची गरज आहे. असे मत व्यक्त केले. प्रमोद संचेती यांनी केवळ पदवी आणि पैसा यावर उद्योग सुरु होत नसतो तर मेहनत,चिकाटी या गुणांची उद्योजक होण्यासाठी गरज असल्याचे सांगितले. आशुतोष जहागीरदार यांनी देशाच्या आर्थिक विकासात उद्योगाचे महत्व स्पष्ट केले. कुलगुरु प्रा.माहेश्वरी यांनी केसीआयआयएलच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांमधुन उद्योजक घडावेत व त्यांचे स्टार्टअप सुरु व्हावेत यासाठी सहकार्य केले जात असल्याचे सांगुन विकसीत भारतासाठी योगदान देण्याचे आवाहन केले.

केंद्राचे संचालक डॉ.राजेश जावळेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. विकास गिते यांनी केंद्राच्या ५ वर्षांच्या प्रवासावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सुत्र संचालन सांगर पाटील यांनी केले. पुढील चार दिवसात विविध उद्योजक व तज्ञामार्फत या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन उपलब्ध करुन दिले जाणार आहे.

---

प्रती,
मा.संपादक/प्रतिनिधी,
कृपया,उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी,ही विनंती.

आपला विश्वासू

( डॉ. सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी